## प्रकरण तिसरे

नामदेव ढसाळ : व्यक्ती ,जीवन आणि साहित्य

ढसाळांच्या कवितेचे प्रेरणास्थान

ढसाळांच्या कवितेतील विद्रोहाचे स्वरूप

संदर्भ, टीपा इ.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

---

## प्रकरण तिसरे

## नामदेव ढसाळ : व्यक्ती, जीवन आणि साहित्य

---

नामदेव ढसाळ हे नाव प्रथम ऐकू येऊ लागले ते एक कवी म्हणून । वेगळ्याच, आक्रमक आणि रसरसलेल्या अशा ढसाळांच्या कवित्वाने सर्व मध्यमवर्गीय साहित्य परंपरा नाकारून दलित संवेदनशीलतेचे वेगळेपण सिध्द केले. मग ढसाळ प्रगटले ते दलित पँथरचे एक प्रवर्तक म्हणून. महाराष्ट्रात आंबेडकरांच्या नंतरचे दलित नेते निष्प्रभ झालेले होते. गटागटात साऱ्या दलित समाजाची फाटाफूट झाली होती. अशा वेळेला नामदेव ढसाळ व राजा ढाले यांनी दलित पँथरच्या रूपाने दलितांच्या चळवळींना नवे अवसान दिले. " दलित पँथर " या संघटनेचे दीर्घकाळपर्यन्त सक्रिय कार्य मोठया जोमाने केले. सध्याही दलित पँथरच्या एका गटाचे ते नेते आहेत. नाकारलेल्या समाजाला परिपूर्ण न्याय मिळावा म्हणून विविध लढे संघटित करीत असतात. ते स्वत:च कबूल करतात की," आज माझे व्यक्तिमत्वच दुभंगून गेले आहे. कनेरसरपूरचा नामदेव ढसाळ आज राहिलेला नाही. तो दलितांवरील अन्याय दूर करणाऱ्या एका युवक संघटनेचा संस्थापक आणि प्रमुख कार्यकर्ता आहे."[१]

नामदेव ढसाळांचे रक्त अस्पृश्याचे आहे.अस्पृश्यतेचा धर्मदत्त शाप ओठ बांधून एखाद्या पवित्र जखमेसारखा जपत आपल्या अस्पृश्य सावल्यांसकट जगले

ते ढसाळांचे पूर्वज होते. दुस-याची ओझी वाहून त्याचा बाप " पोत्या " झाला. नामदेव ढसाळही - या पूर्वजांचा वंशज - कदाचित तसाच जगला असता, परंतु हा वंशज वेगळा निघाला. त्याने त्याच्या समाजाचे भवितव्य बदलून टाकण्याचा चंग बांधला. नामदेव ढसाळांचे शिक्षण एस.एस.सी. पर्यन्त झाले आहे. टॅक्सी ड्रायव्हरचा व्यवसाय चरितार्थासाठी करणारा हा दलित कवी आईशिवाय पोरका असलेला, रस्त्याच्या कडेला घाणीतच मोठा झाला. येणा-या जाणा-याकडे हात पसरून पांच पैसे मागत "दरयाच्या वाटेवर " बसू लागला.

जातियतेने बुजबुलेल्या, रुढीने ग्रासलेल्या व विषमतेने पोसलेल्या विद्यमान धर्म, संस्कृती आणि व्यवस्थेवर कवितेतून केशवसुतांपेक्षाही अधिक तीव्रपणे तुटून पडणारे व्यक्तिमत्व नामदेव ढसाळांचे आहे -- " गोलपिठा ", " मुर्ख म्हाता-याने डोंगर हलविले "," आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी"," गुलाबी आयाळीचा घोडा "," खेळ व आणि हाडकी -हाडवळा " ही त्यांची साहित्य विषयक कामगिरी ! या शिवाय " विद्रोह" या मासिकाचे संपादन. गद्य वैचारिक लेखन आणि कथा लेखनही ते समर्थपणे करतात. काव्यलेखनाबद्दल त्याना राज्यपुरस्कार आणि नेहरुपुरस्कार मिळाला. कादंबरी, कथा, वैचारिक लेखनापेक्षा नामदेव ढसाळांचे खरे क्षेत्र हे कविता लेखनाचे आहे. म्हणूनच नामदेव ढसाळांचा अभ्यास म्हणजे त्यांच्या कवितांचा अभ्यास हे समीकरण सर्वमान्य झालेले आहे.

नामदेव ढसाळांचा " गोलपिठा " हा काव्यसंग्रह जून १९७२ मध्ये प्रसिध्द झाला. " गोलपिठा " मधील ढसाळांची कविताही " दलित साहित्य" या संज्ञेतील सर्व घटक आविष्कृत करत असतानाही खरीखुरी कविता होताना दिसते. तिने स्वत:चे कवितापण येथे जपले आहे. ती प्रचारकी, कंठाळी, पोष्टरबाज झालेली नाही. पण या " गोलपिठा" नंतर मात्र ढसाळांच्या कवितेला हे आत्मतत्व सांभाळता आलेले नाही. ही नंतरची कविता

वक्तृत्वपूर्ण, शब्द उधळणारी, विचारप्रकटीकरणात्मक, निबंधवजा, प्रचारकी आणि काव्यहीन झालेली आहे. कवी ढसाळांवर इथे त्यांच्यातील राजकीय कार्यकर्त्याने मात केलेली दिसते." कविता लिहितो म्हणजे मी राजकीय कृतीच करतो " असे नामदेव ढसाळांना वाटत असल्यामुळे " मूर्ख म्हाता-याने डोंगर हलवले " मध्ये कविता हरवून प्रबंधाचे डोंगर मध्येच उभे राहतात. तेव्हा कवीची संवेदनशीलताच हरवल्याची जाणीव होते. दलित जीवनाचे अनुभव उत्कटपणाने त्यांनी मांडले ते - प्राधान्याने कवितेमधून " जाणत्यां"च्या मनाला ते भिडले. या कवितेने त्याना अंतर्मुख केले. आज त्यामुळे नामदेव - ढसाळ म्हणजे " गोलपिठा " असे समीकरण वाचक मनांत रूढ झाले आहे. म्हणून नामदेव ढसाळांच्या कवितेचा अभ्यास म्हणजे त्यांच्या "गोलपिठा " या काव्यसंग्रहाचा अभ्यास असेच तत्व अंगीकारावे लागते.

दलितांची कविता ही जगणा-यांची कविता आहे. त्यांच्या जीवनामध्ये असलेले भीषण दुःख ते भोगत आहेत. जगत आहेत. हे जीवन जगणे खरोखरच भीषण आहे.खोटया,कृत्रिम माणसांचा बुरखा फाडून टाकण्यासाठी ती जन्माला आली आहे.त्याची कविता ही त्यांच्या जीवनातून निर्माण झालेली आहे. प्रतिभेच्या साह्याने निर्माण केलेल्या स्वप्नरंजित, कल्पनारम्य अशा जीवनाशी - जगाशी त्याचे नाते नाही. कुसुमाग्रजांनी कवितेतून क्रांतीची भाषा केलेली आहे. तर अनिलांनी मानवतेचा पुरस्कार केलेला आहे. पण या सर्वांपेक्षा दलित कविता वेगळी आहे. मर्ढेकरांच्या पासून अनिलांच्या पर्यन्त कवितेतून येणारे जीवनदर्शन आणि ढसाळांच्या " गोलपिठा" मधील जीवनदर्शन यात मोठा फरक आहे. ढसाळांच्या " गोलपिठा" मधील जीवनदर्शन अनोखेच आहे. या कवितेतले जग पांढर-पेशांच्या जगाच्या सीमेपलीकडचे आहे. विजय तेंडुलकर म्हणतात[२] त्याप्रमाणे, "पांढरपेशा जगाच्या सीमा संपून पांढरपेशा हिशेबांनी नो मॅन्स लॅन्ड -- निर्मनुष्य प्रदेश जेथून सुरू होतो तेथून नामदेव ढसाळ यांच्या कवितेचे मुंबईतील

" गोलपिठा " नावाने ओळखले जाणारे जग सुरू होते. हे जग आहे रात्रीच्या दिवसांचे, रिकाम्या किंवा अर्धभरल्या पोटांचे, मरणाऱ्या स्वप्नांचे, उध्वाच्या चिंतांचे, शरम आणि संवेदना जळून उरणाऱ्या मनुष्य देहांचे, असोशी वाहणाऱ्या गटारांचे, गटाराशेजारी मरणाची थंडी निवारीत पोटाशी पाय मुडपून झोपणाऱ्या तरूण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे, खिसे - कापूंचे, बैराग्याचे, दादाचे आणि थडग्याचे, दर्ग्यांचे आणि क्रूसाचे, कुरकुरणाऱ्या पलंगालगतच्या पोपडे गेलेल्या भिंतीवरच्या देवाचे आणि राजेशखन्नाचे, गाजांच्या खाटल्याचे, त्याच खाटल्यावर कोपऱ्यात झोपलेल्या गोजिरवाण्या मुलांचे, त्या मुलाला "शरीफ" बनविण्याची महत्वाकांक्षा बाळगीत जवळच्या कुंटणखान्याची रखवाली करणाऱ्या क्षयरोगी बापाचे हिजड्यांचे, हातभट्ट्याचे, आध्यात्मिक कवाल्यांच्या तक्कड्याचे आणि कोणत्याही क्षणी पाण्याच्या भावाने वाहणाऱ्या ऊन चिकट रक्ताचे, वाफा ओकणाऱ्या पाणचट लालभडक चहाचे, स्मगलिंगचे, नागव्या चाकूचे, अफूंचे . . . जेथे महारोगी शरीरेही किंमत देऊन रस्त्याकडेस भोगली जातात, संभोगाशेजारी अर्भके रडतात, वेश्या गिऱ्हाइकांच्या प्रतीक्षेत गळाभर प्रेमगीते गातात," ---- असे हे जग आहे. मरणाच्या खस्ता खातखात जगणारे, शरम, संवेदना साऱ्या भावना कोळपून राहणाऱ्याचे आहे. हा जगातील माणसे अनेक आहेत. त्याचे जगही तितकेच वैविध्यपूर्ण आहे. (जीवनाच्या विविध स्तरांवरही अगदी तळागाळाचे जिवन जगणारी ही माणसे सर्व प्रकारची आहेत. पोटाशी पायमुडकून झोपणारे तरूण रोगी, बेकार, भिकारी, खिसेकापू, दादा, बैरागी, भडवे, तिथे महारोगी शरीरेसुध्दा किंमत देऊन भोगली जातात. रस्त्याच्या कडेला, संभोगाशेजारी बालके रडत असतात. असे हे जग आहे. इथले जीवन आहे. प्रा. रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे दलितांचे प्रत्यक्ष जग हे भीषण, भयानक, अपमानास्पद घटनानी भरलेले आहे. या जीवनात देह भानाने ते अडकून पडलेले आहेत. कवी स्वानुभव,

कधी सहानुभूतीव्दारा हे जीवन मनोमन संवेदून त्यांची साहित्यचित्रे काढण्याचे अवघड कार्य करीत आहे.

दलितांची कविता एक विशिष्ट जीवन संदर्भ घेऊन आली आहे. शतकानुशतके तळागाळाच्या समाजातील संवेदनाशील मनाचा दबलेला आवाज, कोंडलेला हुंदका या कवितेतून व्यक्त होतो आहे, होत राहणाराच आहे. म्हणूनच नामदेव ढसाळ म्हणतात की,"त्याची सनातन दया फॅाकलंड रोडच्या भडव्याहून उंच नाही " तर त्र्यंबक सपकाळे म्हणतात की,हे संस्कृतीप्रिय देशा, तुला माझे नागवेपण झाकताच आले नाही. ज्यांना जगणे अशक्य करून टाकले होते त्यांनी बंडाचा झेंडा उभारून ,धामधूम उडवून देण्यासाठी ही कवितेची मशाल हाती घेतली आहे. असे भडकणारे मन आग लावणार आहे. तरच जगता येणार आहे असे या कवींना वाटते. म्हणूनच नामदेव ढसाळ यांनी आपल्या समाजाचे भवितव्य बदलून टाकण्याचा चंग बांधला. त्या हीनदीन समाजाला त्यांच्यावरील अन्यायाची जाणीव करून दिली,त्याची अस्मिता त्यानी जागी केली आणि त्यांच्या मनातल्या युगानुयुगे साचत आलेल्या व्यथेला डिवचले,त्याचा विद्रोह जागा केला,त्या समाजाला क्रोध दिला. माणूसपणाचे हे महत्वाचे चिन्ह त्यांनी पिढीच्या कपाळाकपाळावर डागले. अस्पृश्य नवबौध्द बनले,घटनेने दास्यमुक्त झाले, परंतु खेडोपाडी त्याचे नशीब पालटलेच नाही. आंबेडकर गेले, छळ ,जुलूम ,पिळवणूक, विटंबना संपली नाही. शतकानुशतकांची जखम भळभळतच राहिली.ढसाळांच्या कवितेचे या जखमेशी अतूट आणि फार आतले नाते वाटते.

"गोलपिठा " त वाढलेल्या ढसाळांनी जे भोगले ते कवितेत व्यक्त केले आहे. या वेगळ्या जगात वाढलेली ही कविता प्रा.सौ.विजया राजाध्यक्ष यांच्या सारख्या पांढरपेशा मनाला अनपेक्षित,अभूतपूर्व,अनुभव आणून देणारी वाटते. असे वाटणे स्वाभाविक आणि साहजिकच आहे पण प्रा.सौ.विजया राजाध्यक्ष यांना वाटते तशी ढसाळांची कविता फार फेरी, आततायी,

विषाय व कललेली नाहीं तर ती आपल्या मनाच्या जखमा नि:संकोचपणे उघड्या करून दाखविणारी आणि आजवर जे जे भोगले ते सांगता सांगता प्रस्थापित उलथून टाकणारी, त्या पवि-यात उभी असणारी आहे.]

## ढसाळांच्या कवितेचे प्रेरणास्थान

म.फुले, डॉ.आंबेडकर, बुध्द यांचे विचार त्यांचे तत्वज्ञान हा या कवितेचा जीवनाधार आहे. जाति व्यवस्था, वर्णव्यवस्था, विषामतेचा पुरस्कार करणारी मनुस्मृती यांच्या विरूध्द दंड थोपटून आयुष्यभर लढणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दलितकवितेचे प्रेरणास्थान बनने अपरिहार्य आहे. दलित कवितेने बांधिलकी स्विकारली ती आंबेडकरांच्या तत्वज्ञानाशी. याच तत्वज्ञानाने दलित कवितेला दिशा दिली. तिचा तिला असा खास " स्वर " दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे दलित मुक्तिसंग्रामाचे रणशिंग फुंकले, त्या मुक्तिसंग्रामात वाढलेला, जखमा झालेला हा कवी म्हणू लागला.

" जसा जगत आहे मी तसाच शब्दात आहे "

डॉ.आंबेडकर ही ढसाळांच्या कवितेची प्रेरक शक्ती आहे. " सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला " ( आता ), किंवा " काळख तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला " पिसाळलेला जाळ " ( बेंबीचा देठ ओला होणा-या वयात ) अशा शब्दात त्यांनी आपल्याला जागवणा-याचे वर्णन केले आहे. नामदेव ढसाळ त्यांना " रथाचा सारथी " आमचा " मुक्ति-दाता " म्हणतात

" जो स्वतंत्रतेकडून स्वतंत्रतेकडेच जातो<br>
असा तू फूलता एक आमच्या रथाचा सारथी<br>
जो दिग्वीजयी तंद्रीतून आमच्यात उतरतो<br>
नि शेतातून, गर्दीतून, नि मोर्च्यातून नि लढ्यातून<br>
आमच्या बरोबर असतो

नि आम्हाला शोषणातून सोडवतो तो तू
तोच तू आमचा -- ( गोलपिठा पृ.५५ )

नामदेव ढसाळांनी डॉ.आंबेडकर यांनी दिलेल्या संघर्षशील शिकवणूकीने मूलभूत श्रद्धांना आव्हान दिले. म्हणूनच नामदेव ढसाळाचा " क्रांतिपुत्र " पुढे आला.

दलित साहित्याची क्षितिजे आज विस्तारत आहेत केवळ कविताच नव्हे तर आमत्मचरित्र, कादंबरी,आठवणी,नाटक या रूपानेही ते वाढतच आहे. या सर्वात अधिक विस्तार झाला आहे तो कवितेचा. डॉ.आंबेडकरांनी या वर्गाच्या मुक्तीलढयाला तीव्र स्वरूप दिले. त्या प्रेरणेतून ही सारी कविता जन्माला आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वाणी लेखणीची धग पकडून हे लोककवी येथील धर्मव्यवस्थेवर हल्ले करीत ,माणूस तुडवून टाकणारे पारंपरिक,सांप्रदायिक,अप्रतिष्ठित नाकारत आहेत.

" तुफानातले दिवे आम्ही, तुफानातले दिवे ।
वादळवारा, पाऊसधारा,मुळी न आम्हा शिवे ।।"

-- असा आत्मविश्वास निर्भयपणे व्यक्त होऊ लागला आहे. स्वाभिमान, स्वावलंबन आणि सन्मान तेजाळू लागला आहे. शब्दप्रामाण्य झुगारून बुध्दिप्रामाण्य भरास आले आहे. प्रा. गंगाधर पानतावणे[3] यांच्या या म्हणण्याप्रमाणेच नामदेव ढसाळांची स्थिती दिसते -- या निर्घृण व्यवस्थेत हजारो वर्षे मी,माझा समाज पडून सडत होतो, पण डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करून अस्मिता जागृत करून एक जळती मशाल हाती दिली. तिचाच वापर मी सध्या करतो आहे, असे प्रखर विचार नामदेव ढसाळ " बेबींचा देठ ओला होणाऱ्या वयात " या कवितेत मांडतात. डॉ.बाबासाहेबांनी दिलेल्या तेजस्वी संदेशाच्या ज्वाला आपल्या जाग्या झालेल्या लिहित्या

हातांनी पसरीत भविष्यकाळ शिलगावण्याची कवीची इच्छा या कवितेतून प्रभावीपणे आविष्कृत झाली आहे.

डॉ.आंबेडकरांच्या चळवळीने अनुभवांचा अन्वयार्थ लावणारी ही दृष्टी ढसाळांना दिली आहे. " सूर्य फुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षानंतर लाभला " ( आता ) तेव्हा " आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झालेच पाहिजे " अशा शब्दात आपल्या आजच्या आशावादी मन:स्थितीचे वर्णन ढसाळ करतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.फुले यांनी -- " मानवत्वाची प्रतिष्ठा" हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानले आणि दलित समाजाच्या मुक्तिलढा हा दलितांना माणूस म्हणून मानाने जगण्याचे हक्क प्राप्त करून घेण्यासाठीच होता. या मुक्तिलढयात सामील झालेले नामदेव ढसाळ हे कवी आहेत. म्हणून त्यांची भाषा लढयाची आहे. या बंडखोरीची मूलप्रेरणा डॉ.आंबेडकरांच्या विचाराची असणे स्वाभाविक आहे. म्हणून नामदेव ढसाळ म्हणतात --

> धर्माच्या,जातीच्या ,लिंगाच्या,वंशाच्या,वर्गाच्या चिलखती खुराडयांना
> मूठमाती कल्पिणाऱ्या
> झडणाऱ्या बासरीच्या मंद्र पावसात
> आत्म्याला रस्ते फोडून किजेरी झाडांना घेऊन
> ओढल्या गेल्यायत माझ्या दोऱ्या तुझ्या कर्तृत्वाच्या दिशेनं

डॉ.बाबासाहेबांच्या कर्तृत्वाची अनेक रूपे ढसाळांना जाणवतात. बाबासाहेबांनी त्यांच्यातला " माणूस " जागा केला. त्यांच्यामुळेच ढसाळांची कविता " प्रक्षोभ " व्यक्त करू लागली. बाबासाहेबांच्यामुळेच वस्तीवस्तीवर नवा प्रकाश आला. बाबासाहेब आंबेडकरांच्या समोर सर्वच दलित कवींचे मन नत होते. म्हणून ढसाळ म्हणतात --

" जो आणतो जनशक्तीच्या किमयेला जाग "

आणि ---

" जो नूतन वर्षाच्या फुलपाखरासारखा उडतो नि प्रकाश पसरवतो
जो ऋतुंबरोबर वाढत जातो
जो युनिव्हर्सिटयांचे चिरेबंद ढिले करतो
जो स्वतंत्रतेकडून स्वतंत्रतेकडेच जातो
असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी "

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे नामदेव ढसाळांचे स्फूर्तिस्थान आहे. नामदेव ढसाळांनी डॉ.आंबेडकर यांनी दिलेल्या संघर्षशील शिकवणुकीने मूलभूत श्रध्दाना आव्हान दिले.

" तू दिलेल्या संघर्षशील शिकवणुकीतनं मी देतो
मूलभूत श्रध्दांना,वचनांना आव्हान
नि खोदतो स्वत:ला दु:खदैन्यातून अंतिम
कणा पर्यन्त
नि मारतो स्वत:च्याही काळजात पाजळलेल्या कुदळी "

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच आजच्या दलित साहित्याचे, कथा, काव्य,कादंबरी व नाटय यांचे प्रेरक व प्रेरणा होत. त्यानीच अस्पृश्य,दलित यांच्यातील गुलामी जीवनातील दु:ख, अन्याय,अत्याचार यांचे कथन केले. या दु:खाचे अन्यायाचे मूळ त्यानीच समजावून सांगितले. या अन्याय व अत्याचारामुळे अंत:करणात उठणारा चीड संतापाचा डोंब त्यांनीच आपल्या वाणी, विचारात उठवला. आणि त्यानीच हिंदूच्या पारंपरिक रूढी, परंपरा, ग्रंथ व धर्म यांच्या विरोधी ज्वालेसारखा ज्वलंत प्रखर असा नकार आणि धिक्कार दर्शविला. त्यांच्याही पुढे माणसाच्या मुक्तीसाठी त्यांनी बंडाची - विद्रोही,क्रांतिकारक पावले धगधगत्या आंदोलनाच्या व संघर्षाच्या स्वरूपात टाकली व शेवटी माणसाच्या मुक्तीच्या ध्येयाचा

चांगला, सुखाचा शेवट व्हावा म्हणून विचारात व कृतीत विधायक विचारधारा, तत्वप्रणाली दिली. नव्या मूल्यावर आधारणारी नवसमाज निर्माण करण्याची विधायक दृष्टी डॉ.बाबासाहेब यांनी दिली. म्हणून तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन,कार्य व विचार हेच दलित साहित्याचे प्रेरणास्थान होय.

"डॉ.आंबेडकर" ही ढसाळांच्या प्रेरक शक्तीची आणि त्यांच्या बलस्थानाची कल्पना आणून देणारी दीर्घ कविता आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबरच मार्क्स, माओ यांचेही अपरिहार्य उल्लेख "कॉम्रेड अर्थात बारा बलुतेदारासाठी" या सारख्या कांही कवितातून येतांना पाहिले की," नामदेव ढसाळांची भूमिका सामाजिक दृष्टिकोनातून आर्थिक दृष्टिकोनाकडे वळलेली असून ती वर्गवादी झालेली दिसते" असे शंकरराव खरातांनी मांडलेले मत पटू लागते [8] प्रा.निशिकांत ठकार लिहितात,[9] "नामदेव ढसाळांचा कल मार्क्सवादाकडे झुकता झुकताच त्याचा "गोलपिठा" (१९७२) प्रकाशात आला . . . आंबेडकर, मार्क्स व माओ सर्वांनाच बरोबर घेऊन क्रांती करण्याचा ध्यास त्याना लागला आहे. पण त्याला वैचारिक अधिष्ठान नाही.

अर्थाशिवाय बाकीच्या सर्व मूल्यांना निरर्थक मानणाऱ्या,आणि साहित्यादी कलांना हुकुमाचे ताबेदार करणाऱ्या मार्क्सवादापासून दलित साहित्याने दूर राहाणेच हितावह होईल. दलित साहित्याचे डॉ.आंबेडकरांशी असलेले नाते तोडणे दलित साहित्यिकांना शक्य नाही. आणि तसे तोडणे योग्यही नाही. कारण तसे करणे म्हणजे आत्मतत्व गमावून बसणेच होय. आणि ते सर्व दृष्टीनी हानीकारक ठरेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या प्रेरणांशी आणि जाग्या केलेल्या आत्मभानाशी प्रामाणिक राहणे म्हणूनच आवश्यक आणि इष्टही ठरेल. मार्क्सवादातील केवळ अर्थाधिष्ठित विचारदृष्टी,त्याचा धर्मविरोध,त्याचा लोकशाही विरोध

याबाबी डॉ.आंबेडकरांना पटणाऱ्या नव्हत्या. दलितांना केवळ आर्थिक समृध्दी प्राप्त करून देणे एवढेच डॉ. आंबेडकरांचे उद्दिष्ट नव्हते.त्यांना माणूस म्हणून जगण्याचा नाकारला गेलेला हक्क मिळवून देणे हे त्याचे उद्दिष्ट होते. म्हणूनच त्यांनी पत्करलेल्या कार्याच्या सिध्दीसाठी प्रयत्नशील राहू इच्छिणाऱ्या नामदेव ढसाळांसारख्यानी मार्क्सवादाच्या स्वीकृतीसंबंधी शंभरवेळा विचार करणे योग्य होईल.

## ढसाळांच्या कवितेतील विद्रोहाचे स्वरूप --

दलित साहित्य म्हणजे विद्रोहाचा जाणीवपूर्वक उद्घोष करणारे साहित्य असा विचार सर्वांनी वारंवार मांडला आहे. धर्मांतरानंतर अन्याय, छळ,वेदना सोसणाऱ्या या दलित वर्गातून "विद्रोहा"च्या ठिणग्या पेटल्या. सम्यक परिवर्तन या साहित्याला अभिप्रेत असल्यामुळे दलित साहित्य सर्वकष क्रांतीचा पुरस्कार करू लागले आहे. कोणत्याही लेखकाच्या मनात विद्रोहाची भावना उदयास येईल, पण दलित लेखकाचा विद्रोह निराळा.आपण माणूस आहोत आणि माणसाचे सारे हक्क आपल्याला मिळायला हवेत या जाणिवेतून विद्रोह जन्माला आलेला आहे. अस्पृश्यता घालविण्यासाठी राजकीय,आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक व मानसिक परिवर्तन आवश्यक आहे. अशा सम्यक "क्रांती"साठी दलित साहित्य विद्रोहाची भूमिका घेते. नवा माणूस निर्मिण्यासाठी सम्यक क्रांतीची जरूर आहे. दलित लेखकाला अभिप्रेत आहे तो नवा माणूस ! म्हणून त्यांची भाषा विद्रोहाची आहे, त्याची भाषा सम्यक् क्रांतीची आहे.

नामदेव ढसाळांची कविता क्रांतीची भाषा बोलत असते कारण

" येथला प्रत्येक हंगाम बेदर्दीच असतो

-------

इथे पापणीलाच केस नसतो
आणि बुबळांच्या कांचा झालेल्या असतात रे

- - - - - -

इथे माणसालाच माणूस खात असतो "

आणि म्हणून " रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांना " हाकारीत "अंधार-यात्रिक " होण्याचे ती नाकारते आहे." शहराशहरात आग लावण्याचे " पुकार देत सुसाट निघते आहे. आजच्या मराठी कवितेत क्वचित आढळणाऱ्या खऱ्याखुऱ्या बंडखोरीच्या झळाळत्या प्रत्ययाने मी दिपून गेलो अशी कबुली विजय तेंडुलकरांनी दिली आहे.[5] ढसाळांचे या प्रकाराचे लिखाण चुकूनही प्रचारकी झालेले नाही. हे विशेष. ही बंडखोरी आत्म्याची आहे.कंठाळी नाही. या बंडखोरीला - कवितेपुरते तरी - राजकीय रंग नाहीत. या बंडखोरीबद्दल विजय तेंडुलकर लिहितात, -- ती अधिक मूलभूत स्वरूपाची आणि म्हणून अस्सल आहे. " स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नांव आहे ", " पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद मगोष्ट " असे म्हणण्याचा छातीठोक निर्भयपणा तिच्यात आहे - - - - - " ज्यांना आपल्या गांडीखालचाच अंधार कळत नाही त्यानी पेटलेल्या माणसांना छप्पन टिकली बहुचकपणा अजूनही दाखवावा ? " --- असे ती न कचरता म्हणू शकते." व्यासपीठावरून समग्र बलात्कार घडवून आणावेत ,साहित्य संघ, शाळा,कॉलेज, हॉस्पिटले, विमान अड्डे यावर हातबॉंब, हैड्रोजन बॉंब टाकावेत " -- असे घोषित करण्याइतकी ती निर्णायक आहे. तडजोडीचे सर्वपूल तिने केव्हाच उडवले आहेत आणि प्रस्थापिततेच्या सर्वनाशाचा विडा तिने उचलला आहे. ढसाळांच्या कवितेला त्रिकाली झुंजीचा ध्यास लागून राहिला आहे " -- दलित कविता म्हणूनच गुंजनाच्या वा रंजनाच्या भाषेत न बोलता,समतेच्या आड घेणाऱ्या प्रवृत्तीच्या भंजनाच्या भाषेत बोलते आहे.यशवंत मनोहर म्हणतात[7] त्या प्रमाणे ती " अपूर्वयुद्धकांडच " होऊन आली आहे. दलित कवितेच्या या बंडखोर - विद्रोही स्वरूपाबद्दल निर्मलकुमार फडकुले यांनीही सविस्तर विवेचन केले असून ही दलित कविता म्हणजे साहित्यात पडलेली एक बंडाची अपरिहार्य ठिणगी आहे.असा त्याचा उल्लेख निर्मलकुमार फडकुले करतात तो योग आहे.

" सडत होतो आम्ही अगतिक किडया सारखे
आज पर्यन्त . . . . .
लक्तरात गुंडाळलेली आमची अब्रू
गोलपिठयावर नागविणारानो -
तुमचा ऱ्हास जवळ आलाय - - - -
आम्ही जिवंत झालो आहोत
--- तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी !

नामदेव ढसाळांच्या ह्या पेटलेल्या शब्दात बंडखोरीची तशीच क्रांतीची ऊर्मी आहे.

दलितांची ,अस्पृश्यांची भयंकर स्वरूपाची ही परिस्थिती पाहून नामदेव ढसाळांचा या युगातला क्रांतिपुत्र पुढे येतो , आणि आपल्या आईच्या समजुतीसाठी चार शब्द बोलून तो क्रांतिपुत्र फाशीच्या तयारीने दलितांच्या बंद मुक्ति लढयात उतरण्याची घोषणा करतो

" आई तो तुझा लाडका
तुझा पोर हा पोर नाही
या युगातला तो क्रांतिपुत्र आहे, त्याला चक्क दिसत आहे
अगोदर कितीतरी तू वाकत आली आहेस,
जर अशा निर्णायक क्षणाला तू जमीन दोस्त झालीस
तर तुझ्या निश्चेष्ट शरीरावरून मला निर्दयपणे पुढे
चालत जावे लागेल.
एवढया कृत्याचा धनी आई मला तू करू नकोस ,करू नकोस
आई ज्या दिवशी तू माझी नाळ कापलीस
त्याच दिवशी का दिले नाहीस माझ्या नरडीला नख
आज तू माझ्या कल्पनेतल्या छळाला घाबरतेस
माझ्या तुरुंगवासाला

उद्याच्या फाशीला घाबरतेस
आई हे थंडमरण मला सहन होत नाही
तू हे सर्व समजून घे.

( आम्ही, दिवाळी अंक १९७३, पान ४-५ )

याच दिवाळी अंकात पान ७८ वर नामदेव ढसाळांनी आपली भूमिका विशद करताना म्हटले आहे (" दलितांच्या मुक्तिलढा सर्वंकष क्रांती, भागश: बदल अशक्य आहे, तो आम्हाला नको. संपूर्ण क्रांतिकारक बदल आम्हाला हवा आहे ") आणि म्हणून मग ढसाळांची कविता क्रांतीची भाषा बोलत असते.

"माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे "

असे ती सुचविते.

जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून ही अशीच निर्मिती होणार, नरकाच्या कोंडवाड्यात नष्टचर्यांच्या गटारात अगतिक किड्यासारखे जीवन किती दिवस जगायचं ?

" राम राज्याच्या कितव्याघरात आपण -होतोत
उद्गम, विकास, उंची, संस्कार, संस्कृती
कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा "

( निमित्त १५ ऑगस्ट १९७१ )

स्वातंत्र्य येऊन इतकी वर्षे झाली तरी सामाजिक व आर्थिक विषमता वाढतेच आहे. दरिद्री अधिकच दरिद्री होतो आहे. ज्यांच्या हाती सर्व क्षेत्रात नव्याने सत्ता एकवटत चालली ते ग्रामीण व नागरी क्षेत्रातील नेते दलितवर्ग म्हणजे आपली मालमत्ताच समजत आहेत. आपल्या पाशवी वासनांच्या तृप्तीसाठी हा नेता गावकुसाबाहेरच्या बायकांवर बलात्कार करतो, झोपड्या पेटवून देतो म्हणून या स्वातंत्र्याचा अर्थ काय असा दलित

कवितेचा सवाल आहे. ढसाळ " निमित्त १५ ऑगस्ट ७१ " या कवितेत लिहितात --

"पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय मंगोष्ट
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नांव आहे "

( गोलपिठा -- ७४ )

" स्वातंत्र्यात माणूस निराश व्हतो " असा ढसाळांच्या मनात विषाद आहे." माझा बाप माझ्याबद्दल निराश हे,माझा समाज माझ्याबद्दल निराश हे " असे म्हणणाऱ्या ढसाळांची कविता म्हणजे उफाळणारा ज्वालामुखी आहे. तेही रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांना आवाहन करून म्हणतात

" किती दिवस सोसायची ही नाकेबंदी
मरेपर्यन्त राहयचे का असेच युध्दकैदी ?
ती पाहा रे ती पाहा,मातीची अस्मिता आभाळ -
- भर झालीय
माझ्याही आत्म्याने झिंदाबादची गर्जना केलीय
रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो
आता या शहराशहराला आग लावीत चला "

या कवितेने जणू जगण्यातील दाहकता मूर्त केली आहे. ती आहे खरीखुरी बंडखोरी. आपल्या पांढरपेशी कवितेत ती क्वचितच आढळते.ही बंडखोरी ऊरबडवी नाही.ती प्रस्थापिताचा सर्वनाश करू पाहते.ढसाळ म्हणतात,

माणसाने रस्ते उखणावेत,ब्रीज उखडावेत
दिव्याचे खांब कलथावेत
पोलीस रेल्वे स्टेशने तोडावीत
बसेस ट्रेन कार गाड्या जाळाव्यात

साहित्यसंघ, शाळा, कॉलेज, हॉस्पिटल, विमानअड्डे,
राजधान्या, इमले, झोपड्या, वखवखलेल्या भुकाळलेल्या
यावर हातबॉम्ब, हैड्रोजन बॉंब टाकावेत

अशी प्रस्थापित उध्वस्त करू पाहणारी ही कविता आहे.

नामदेव ढसाळांच्या कवितेतला संताप, विद्रोह नकारात्मक आहे असे प्रा.सौ.राजाध्यक्ष यांना वाटते[१] त्याचे हे मत साहजिकच आहे. सौ.विजया राजाध्यक्ष यांच्या सारख्या पांढरपेशा मनाला तसे वाटणे साहजिकच आहे. कारण ढसाळांच्या" जगाची " त्यांना ओळख नाही.पण ज्यांना हे जग ओळखीचे आहे त्यांना या " अनुभवा"मध्ये जी चीड,जो संताप,जो उद्वेग व्यक्त झाला आहे, तो " मूल्यवान" वाटणार .तेव्हा ढसाळांच्या कवितेमध्ये आलेला संताप, बंडाची भाषा ही नकारात्मक मुळीच नाही. ती नकारात्मक असल्याचा आरोप प्रा.सौ.विजया राजाध्यक्ष यांनी केलेला आहे तो निराधार आहे. उलट दलित साहित्य जेव्हा नाकारीत असते तेव्हा त्याने स्वीकारलेले असते ते चिरंतन मूल्य ते म्हणजे माणसाचे महानत्व ! ढसाळांच्या सारखा कवी जो विद्रोहाची,बंडाची आणि क्रांतीची भाषा बोलतो त्याच्याही डोळ्यापुढे काही स्वप्ने आहेत. मूल्ये आहेत --

" आज आम्हाला या खोपटा खोपटातून
पूर्ण सूर्य दिसतोय "

(आमच्या आळीतून जाताना )

किंवा

" मी हे सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात
जागे झालेत
हजारो वर्षो होतो मी खंगत
या गुहागुहातल्या प्रचंड अंधारात

काळ्या तो गुहेच्या तोंडाशी ठेकून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावित जाणार आहे हा पुढचा काळ
( बेंबीचा देठ ओला होणाऱ्या वयात )

अशा या उद्याच्या जीवनाची त्याला ओढ आहे -- " माणसाने " या कवितेत ढसाळांनी जी स्वप्ने व्यक्त केली आहेत ती पहाता ढसाळांची कविता ही माणसासाठी अवतरलेली आहे. त्यातील विनाश, उद्रेक, संताप साऱ्या भावना ह्या अतिरिक्त अशा कोणत्याही प्रकाराच्या हव्यासातून निर्माण झालेल्या नाहीत हे स्पष्ट होते. नामदेव ढसाळांनी नकाराबरोबर स्वीकारले आहे ते माणसाचे गाणे, माणसाला महान मानणारे जग, " माणसाने " या कवितेत ते "स्वप्न" व्यक्त करताना ते लिहितात --

" नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये.
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून त्याच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने रहावे
चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा -
- माणसावरच सूक्त रचावे
माणसाचे गाणे गावे माणसाने.

दलित कवींना संस्कृतीला अवकळा आणणाऱ्या अस्पृश्यतादी कल्पनाच उध्वस्त करावयाच्या आहेत सगळेच कांही झुगारून देण्याची दलितांची भाषा पोकळ नाही. दलित कवीचे बंड केवळ नकाराचे नाही. दलितांच्या भाषेमागे एकमूलत: तात्विक अधिष्ठान आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व सामाजिक न्याय ह्या चार गोष्टी दलित कवीच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. एकूण दलित कवितेच्या बाबतीत सुप्रसिध्द विचारवंत प्रा. गं.बा. सरदार यांनी मुंबई येथे भरलेल्या दलित साहित्य संमेलनात काढलेले उद्गार हे अत्यंत बहुमोलाचे व समतोल विचार सरणीचे द्योतक आहेत. प्रा. सरदार म्हणतात[10] " आज

शतकानुशतके कुंचबलेले थर दलितांच्या कवितांच्या,साहित्याच्या रूपाने बंधमुक्त होत आहेत.त्यांच्या,वेदनांची व आशा आकांक्षाची समरसतेने दखल घेण्याची वृत्ती या पारंपरिक साहित्यात आढळत नाही.... स्वत:च्या ज्वलंत जाणिवा आणि ध्येयवाद यांना स्थान नाही.असे वाटून दलित साहित्यिकांनी बंडाचे निशाण उभारले तर ते स्वागतार्ह मानायला हवे "

दलित कवितेचा बंडखोरपणा स्पष्ट करतांना दलित कविता प्रत्यक्ष बंड कार्यान्वित करीत नसली तरी तिचे नाते बंडखोर सर्जनाशी आहे असे ताराचंद्र खांडेकर यांचे मत पटणारे आहे. दलित कवींना क्रांतीचा ध्यास लागलेला आहे. याचे कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांच्यासाठी या देशाने कांहीच पावले उचलली नाहीत. नुसत्या शैक्षणिक सवलती वा नोक-यांत काही राखीव जागा दिल्यामुळे या समाजाचे मूळ दु:ख नाहीसे होणार नाही. सर्व दृष्टीने या वर्गाचा स्वतंत्र भारतात भ्रमनिरास झाला आहे. म्हणून ते चिडून लिहितात --

" ही लोकशाही नाही हे
ही विटंबना सतरा पिढ्यांची मूग गिळून पोसलेली
हा प्रकाश नाही हे
हा पिंजरा पिळवणुकीचा

ही पिळवणूक, अपेक्षाभंग, अत्याचार,ही विटंबना या नीच या "क्रांती"ला जन्म दिला आहे. या दलित कवींना जीवनाच्या सर्व क्षेत्रांतक्रांती अपेक्षित आहे.नव्या मूल्यांची स्थापना तिला करावयाची आहे.

नामदेव ढसाळांच्या कवितेतून येणारी क्रांतीची भाषा आणि विंदा करंदीकर,शरश्चंद्र मुक्तिबोध यांच्या कवितेतून प्रकट होणारी क्रांतीची भाषा ही वेगळी आहे. करंदीकर,मुक्तिबोध यांच्या कवितेत " शोषणमुक्त" समाजासाठी क्रांती हवी अशी भावना आहे आणि त्यातही "आर्थिक

विषमता " नष्ट होण्यावर भर आहे. " आर्थिक समते " नंतरही सामाजिक विषमता चालू राहू शकते हा दलित कवींचा अभिप्राय आहे. म्हणून आर्थिक समते बरोबरच सामाजिक जीवनामध्येही समता निर्माण झाली पाहिजे अशी नामदेव ढसाळादी कवींची मागणी आहे. आर्थिक विषमता नष्ट होऊन केवळ समता निर्माण होत नाही तर राजकीय,सांस्कृतिक,सामाजिक व शैक्षणिक जीवनामध्येही समता निर्माण झाली पाहिजे अशी नामदेव ढसाळांदी दलित कवींची मागणी आहे। ढसाळांच्या ध्यासाचे केवळ विषयच करंदीकर,मुक्तिबोधां पेक्षा वेगळे आहेत हे प्रा.सौ. विजया राजाध्यक्ष यांचे म्हणणे खरे नाही.

दलितांची कविता ही एक शक्ती आहे. आणि ती क्रांतीच्या प्रक्रियेला गतिमान करील कारण कविता प्रत्यक्ष क्रांती करीत नाही.पण क्रांतीला जन्म देणाऱ्या मनाची मशागत करते. विचाराची ठिणगी टाकीत आचाराला प्रवृत्त करते. या कवितेतून व्यक्त होणारा विचार प्रक्षोभशील व बहुपरिणामक्षम आहे. इत:पर अन्याय सहन करणार नाही असा घोष ही कविता करीत आहे.

परंपराप्रिय अशा जनमानसामध्ये आणि प्रस्थापित अशा साहित्याच्या प्रवाहात दलितांचे साहित्य उदयाला आले. एक फार मोठी शक्ती घेऊन ते अवतरले.वणी येथील साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना डॉ. भालचंद्र फडके म्हणतात,[११] " दलित साहित्याने येथील समाज व्यवस्थेविरूध्द, विषमतेचा विचार पोसणाऱ्या साहित्यातील परंपराविरूध्द समाजाचे विघटन करणाऱ्या जातिप्रथाविरूध्द विद्रोहाची आग भडकावित नेली.सम्यक क्रांतीचा वसा दलित साहित्याला घ्यावाच लागला. हे विद्रोहीसाहित्य म्हणजे एका अर्थाने जमीन भाजणेच होते.अस्पृश्यतेशी आणि दु:खाशी विद्रोह करणे दलित साहित्याला भाग होते.

नामदेव ढसाळांसारख्या कवींची ही दलित कविता क्रांतिसन्मुख कविता आहे. कारण हा कवी दुखावलेला आहे. इतर कवींचे दुखणे आणि दलित कवींचे दुखणे यामध्ये फरक आहे. अनेक अत्याचार, अन्याय त्यांनी सोसलेले आहेत. त्यांच्या तोंडातून, मुखातून, वाणीतून क्रांतीची भाषा यावी यात गैर काय आहे ? ही क्रांतीची भाषा बोलते, यात या कवितेला कुठलाही कमीपणा येण्याचे कारण नाही. कारण ही क्रांती " माणसा" साठी आहे.

ढसाळांची कविता अशी आवाहनात्मक, प्रकाशपूजक आणि क्रांतिप्रवण" तुम्ही प्रकाशाचे पुजके व्हा", "क्रांतीचा माणुसकीचा जयजयकार करा " -- अशी सांगणारी आहे. क्रांतीची भाषा बोलणारी ही कविता वाचली की, दलित साहित्यिक हे सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचे उद्गाते आहेत, या प्रा.गं.बा.सरदार यांच्या विधानाची सत्यता पटू लागते.[१२]

"क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले. आम्हांसह चाक पूर्ण फिरल्या शिवाय खरी क्रांती होऊच शकत नाही. ते चक्र आम्हीच फिरवू " -- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या क्रांतीदर्शी विचारापासून प्रेरणा घेवून आजचे दलित साहित्य-अवतरते आहे. हे दलित साहित्य म्हणजे दलित जीवनाचा कलात्मक दस्तऐवज आहे. दलित कविता ही या साहित्याची गंगोत्री आहे. जखमेतून स्त्रवणाऱ्या रक्तबिंदूचे चैतन्य लेवून आधुनिक मराठीतील दलित कवितेने अनुभूतीचे नवे क्षितिज गाठले आहे. ही कविता नुसत्या शाईने लिहिलेली नाही. दलित कविता ही रक्ताने लिहिलेली कविता आहे.[१३] (नामदेव ढसाळांची कविता अत्युग्र, रोखठोक, क्रांतिप्रवण व भविष्यदर्शी आहे. तिच्या आवेगामुळे व सरळ-सोटपणामुळे ती रसिक मनाला अंतर्मुख तर करतेच पण त्यांची झापडही पूर्णपणे झटकून काढते. शतकानुशतके सोसाव्या लागणाऱ्या छळाने, अन्यायामुळे समाजाच्या मनात जे प्रक्षोभक भाव उदयाला आले त्या समाजाचे मन ढसाळांनी अतितीव्र प्रखर शब्दांत व्यक्त केले आहे. आजच्या प्रस्थापित व्यवस्थेचा आणि संस्कृतीचा धिक्कार करून तिला सरळपणे नकार देणारी

" येथला प्रत्येक हंगाम " ही कविता लक्षणिय आहे. अनावश्यक खतरांचा उद्घोष करणारे व माणसाला बरबाद करणारे येथले सर्जन कवीने हास्यास्पद ठरवले आहे.

या समाजाची आणि त्यात राहणा-या संधीसाधुची कवीला चीड येते. कवी म्हणतो येथील कोरडे अध्यात्म,सोयीची नैतिकता,उपदेशाचे अमृत किंवा रुढीची मदिरा स्वार्थाला धक्का लागणार नाही अशा कंजुषाकृतीने वाढणारे त्यांचे मन हे ख-या आपुलकीने कधीच भरलेले नसते. कारण दुस-याच्या सुखदु:खाने पेटण्याची त्यांच्यात क्षमताच नसते. येथील महाकवीचे लेखन माणसाच्या मूळदु:त्वाकडे डोळे झाक करणारे असते.सत्ताधिशांच्या मनोरंजनाचे लिबलिबीत साधन म्हणूनच ते निर्माण झालेले असते.

" येथला प्रत्येक महाकवी आखूडच असतो
म्हणून शब्दांच्याच नजाकतीला भुलणं शोभत नाही रे
इथे माणसालाच माणूस खात असतो
आणि वाल्याच्या पाठीवरचे वळ लपविले जातात रे "

आयुष्यभर रक्ताळेपर्यन्त श्रमकरणारा जन्मदाता बाप, दगड फोडून, एकाग्रतेने मूर्ती घडविणारा शिल्पकार वडारी आणि त्यांच्या श्रमावर आपल्या सांस्कृतिक महात्मतेचा डंका मिरविणारे सुखवस्तू या उपलब्ध वास्तवता कवीला कोठे ही सुसंगती दिसत नाही.घाम गाळणाराने बकाळपणे - जगावे,वागावे आणि इतरांनी मोठेपणा मिरवावा हे द्वैत त्याला सैरभैर करते. म्हणून कवी पिसाळतो. आणि दगड डोक्यात घालून तें संपविण्याची कृती करावयास सिध्द होतो. ढसाळांची " बाप,वडारी आणि मी ..... यांची कविता " ही अत्यंत बंदिस्त व अविशपूर्ण अशी कविता आहे.

ज्या लोकांनी या समाजाच्या सुखासाठी आपल्या सर्वस्वाचा होम केला,याचे ताजमहाल उभे केलेत, सुख,समृध्दी व ऐश्वर्याची सर्व सुख साधने दिली त्या लोकांची - आठवण आज राहिलेली नाही. याची खंत व चीड कवीला येते.

म्हणूनच कवी म्हणतो की माझ्या नजरेत आता तुझ्याबद्दल जरा सुध्दा आदर नाही. तुझे गुणगान गावे असे वाटतच नाही. त्यापेक्षा असे अमानुष वर्तन करणाऱ्यांचा अधिक्षेप त्याच्या तोंडावर पचापच थुंकून करावा आणि वीर्य किंवा विटाळ जर एखाद्या गाडग्यात जमवून ठेवला असेल तर त्यात बुडवून विटंबना करावी. कवीचा त्वेष, आवेश शब्दाशब्दाला वाढत वाढतच आहे. तो म्हणतो मी तुला, तुझ्या ग्रंथांना, तुझ्या संस्कृतीला पाखंडीपणाला आणि आईबापांना देखील शिव्या द्यायला मागेपुढे पाहणार नाही. कारण तुम्ही येथे जन्म घेऊन बर्बाद झालात आणि मला पण जन्म देऊन माझे आयुष्य बर्बाद केलेत.

ज्या लोकांच्या काबाडकष्टावर ही संस्कृती पोसली आहे अशा उध्दारकर्त्याला पध्दतशीर नाकेबंदी केली गेली. गावाबाहेर त्यांना राहण्यास बाध्य करण्यात आले. कवी म्हणतो ---

संस्कृतीच्या नावाखाली तू त्याला
वेशी बाहेर काढलेस
बारा महिने तेरा काळ कढत ठेवलेस,
रडत ठेवलेस, सडत ठेवलेस.

या सर्व परिस्थितीमुळे कवी म्हणतो की, तूच माणसाला असे हीन केलेस. माणसालाच माणसाची विष्टा काढायला लावली. गावाच्या बाहेर चालणारा आक्रोश तुला ऐकू आला नाही का ? या अन्यायामुळे पेटून उठलेला माणूस तुला कोठे दिसला नाही कां ? असे एका पाठोपाठ अनेक प्रश्न कवीने -- विचारले आहेत. ज्या लोकांनी या समाजाच्या सुखासाठी आपल्या सर्वस्वाचा होम केला . सुख, समृध्दी व ऐश्वर्याची सर्व सुखसाधने दिली त्यांची जरा तरी आठवण ठेव.

ज्यांच्या हाडामासांचा खच आजही तुझ्या किल्ल्या किल्ल्याच्या
पायथ्याशी कण्हतो आहे
सांग, त्यांच्यासाठी का लिहीत नाहीस मैलामैलाच्या दगडावर एखादी --
-- ओळ ?

कवी म्हणतो की मोठमोठया वास्तू गोरगरिबांच्या व श्रमक-यांच्या मेहनतीतूनच आकारास येतात. काम करून करून शेवटी त्यांची माती होते हा संदर्भ तर आहेच पण जर असे काम होत नसेल तर त्या कामाच्या पूर्ततेसाठी नरबळी दिला जात असे व महारमांगाचा बळी देणे हे तर शास्त्रसंमत होतेच. किल्ल्यांच्या पायामध्ये कितीक गाडलेली माणसे कण्हताहेत पण त्याची दखल घ्यावीशी कुणाला वाटली नाही. याची खंत व चीड कवी येथे प्रकट करतो.

म्हणूनच या निर्घृण व्यवस्थेत हजारो वर्षे मी,माझा समाज पडून खंगत होतो पण डॉ.आंबेडकरांनी धर्मांतर करून नवी अस्मिता जागृत करून एक जळती मशाल हाती दिली. तिचाच वापर मी सध्या करतो आहे. या बंडखोरीची मूलप्रेरणा डॉ.आंबेडकरांच्या विचाराची. तसे असणेही स्वाभाविक आहे. ढसाळ म्हणतात ---

धर्माच्या,जातीच्या,लिंगाच्या,वंशाच्या,वर्गाच्या -
- चिलखती बुराडयांना
मूळमाती कल्पिणा-या
झाडणा-या बासरीच्या मंद्र पावसात
आत्म्याला रस्ते फोडून विजेरी झाडांना घेऊन
ओढल्या गेल्यायत माझ्या दो-या तुझ्या कर्तृत्वाच्या दिशेनं
-- बाबासाहेबांनी त्यांच्यातला " माणूस " जागा केला .त्यामुळेच ढसाळांची कविता " प्रक्षोभ " व्यक्त करू लागली. बाबासाहेबांच्या मुळेच वस्तीवस्तीवर नवा प्रकाश आला. त्यांनीच धर्मांतर करून नवी अस्मिता जागृत करून एक जळती मशाल हाती दिली. तिचाच वापर

मी सध्या करतो आहे असे प्रखर विचार नामदेव ढसाळ " बेबींचा देठ ओला होणा-या वयात " या कवितेत मांडतात.

ढसाळांची कविता दलित जाणिवांना आकार देत संघर्षाला सामोरी जाणारी, प्रस्थापित मूल्ये उधळून देणारी आणि माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहणारी लढाऊ कविता आहे. नुसते " गोलपिठया " तील - जीवनाचे दाहक भान आणून देणे हे तिचे उद्दिष्ट नाही, तर " माणूस " म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहाणा-या समाजाच्या मनातला धुमसत राहिलेला अंगार त्यांच्या कवितेत व्यक्त होतो. आणि तोच त्यांच्या कवितेचा उद्देश आहे.

साकाळलेल्या धर्मावर, वर्गीय प्रवृत्तीवर, ढोंगी व्यवस्थेवर, कालबाह्य पारंपरिकतेवर, गुलगुलीतपणावर आणि स्वैराचारी आविष्कारावर ती त्वेषाने हल्ला चढविते. तिला हळुवार भाषेत व लयबध्द रंजकभाव बोलीत, म्हणूनच बोलण्याचे प्रयोजन उरत नाही. विद्रोही कविता शोषण करणा-या सर्वपाशांना जाळून खाक करण्यासाठी अंगार घेऊन उठत आहे. वैचारिक इंगळीची धग, या कवितेच्या आंगोपांगातून, प्रक्षेपित होत असते. उपलब्ध काव्य संकेताशी व आस्वादन प्रक्रियेशी त्यामुळेच तिचे खटके उडतात.

दलित कवींच्या कवितेमागील प्रेरणाबळ व निष्ठा वेगवेगळ्या आहेत. त्यांच्या स्वभावानुसार कधी सौम्य तर केव्हा जहाल रंगातून ते आविष्कृत होतात पण मूळच्या विद्रोही बीजापासून ते ढळत नाहीत.

* नामदेव ढसाळासारख्या कवींनी रसरशीत विद्रोही कविता दिली. काजळाने बरबटलेल्या अनेक शतकाच्या जीवन रंगाचे अमोघरूप व्यक्त करणारी, लवचिक पण पोलादी कविता . . . पूर्व जीवनाच्या सर्व दूषित संदर्भाचे " उत्खलन" केले. त्याप्रमाणे भविष्यातील भव्योज्ज्वल स्वप्नेही सांगितली.

" आज आम्हाला या खोपटा खोपटातून

पूर्ण सूर्य दिसतोय "

( आमच्या आळीतून जाताना )

असे आत्मविश्वासाने ती गावू लागली. विद्रोही कवितेने - " जीवनास अग्रक्रम " दिला आहे. आणि म्हणून निर्मलकुमार फडकुले सांगतात[१४] त्याप्रमाणे विद्रोही प्रवृत्तीचे पेटते स्वर मुखरित होत असलेल्या या साहित्याचे स्वागतच केले पाहिजे. प्रा.गं.बा.सरदारांनी दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात हे स्वागतार्ह आहे असेच बोलून -- दाखविले आहे.

* नामदेव ढसाळांची कविता जातीयतेच्या विरूध्द व अस्पृश्यतेच्या विरूध्द आपले विद्रोही रूपच घेऊन विजेचा कडकडाट घेऊनच,आली आहे. त्यांचा " गोलपिठा" असाच दलितांच्या मुक्तिसंघर्षाची विद्रोही काव्य गातोय. श्री.ढसाळांच्या कवितेने दलितांच्या कवितेचे नवे युगच-नव्या कालखंडाची सुरूवातच केली आहे. असे शंकरराव खरातांचे म्हणणे आहे[१५] केशवसुतानंतर - विद्रोहाचा इतका प्रभावी आविष्कार करून मराठी कवितेच्या इतिहासात खरोखरच नवे पर्व उलघडणारी ही दलित कविता आहे.

समाजामध्ये माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे आणि समाजातील एखाद्या वर्गाला शतकानुशतके धर्माच्या,रूढीच्या व परंपरेच्या नावाखाली पशूपेक्षाही हीन दर्जाने वागवले गेले असते तर, त्यांच्यातला कवी विलक्षण त्वेषाने संतापाने म्हणणारच ---

" माण्साने प्लेटो,आईनस्टाईन,आर्किमिडीज,साक्रेटिस ,मार्क्स,
अशोक,हिटलर,बिटलर,कामू,सार्त्र,काफ्का,बोदलेअर,रेम्बो,
इझारा पाऊंड,हाफकिन्स,गटे ,दोस्तोव्हस्की,मायकोव्हस्की,
मॅक्सीम गार्की, एडिसन,मेडीसन,कालिदास,तुकाराम,व्यास,
शेक्सपीअर ,ज्ञानेश्वर,वगैरेंना त्यांच्या शब्दासकट गटाराचे
मेनहोल उघडून त्यात सलग सडत ठेवावे.

( गोलपिठा : माण्साने )

माणसाने जगातील सर्व धर्मग्रंथाची,ईश्वरग्रंथाची पाने फाडून त्यावर हागावे आणि सारे काही उध्वस्त करावे. बेलाशक अराजक बनावे असे ढसाळ म्हणतात. असे म्हणतांना ढसाळांची कविता ही विलक्षण त्वेषाने व आवेशाने बोलत आहे.

गोलपिठयातील या माणसाला माणूस म्हणून किंमत नाही. स्वातंत्र्यप्राप्त होऊन अनेक वर्षे लोटली तरी वर्ण व्यवस्थेच्या व समाज व्यवस्थेच्या रचनेमुळे ज्याला देशाने, स्वातंत्र्याने कांहीच दिले नाही, उलट सतत नैराश्य, लाचारी,दैन्य,अन्याय हेच दिले त्याच्यातील प्रक्षुब्ध झालेला कवी " स्वातंत्र्यात माणूस निराश व्हतो " असे सांगणार आणि - " स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव ? " असेत्याने विचारले तर त्यात मुळीच चूक नाही.उलट त्या जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणूनच ही अशीच निर्माण होणार .

जिवाचे नाव लवडा ठेवून जगणाऱ्यांनी
खुशाल जगावे . . . .
मी तसा जगणार नाहीय

या ओळीतून ढसाळांचा जसा निर्धार व्यक्त होतो तसा त्यांच्या मानवत्वाच्या प्रतिष्ठेवरचा विश्वास व्यक्त होतो. आता त्यांची कविता संघर्षाला सामोरी जाणारी,प्रस्थापित मूल्ये उधळून देणारी आणि माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहणारी लढाऊ कविता आहे.

" आत्ता आम्ही कत्तलखोर होत आहोत " असे त्यांचे म्हणणे आहे. गंगाधार गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे फक्त निडर उघडपणा,खोल आणि वाहत्या जखमांचे प्रदर्शन, जळता संताप आणि असीम वैफल्य,समाजाला पूर्णपणे झिडकारण्याची वृत्ती,निर्दय सूड घेण्याची हाक या सर्व गोष्टी निषेधवादी साहित्यात अपरिहार्यपणे आढळतात.दलितांनी - दलितकवितेने वैफल्याचा भाव व्यक्त केला नाही. मात्र विषमतेचा विचार पोसणाऱ्या

सर्व प्रवृत्ती विरुध्द विद्रोहाची आग भडकावीत नेली. सम्यक्क्रांतीचा किंवा सर्वंकष क्रांतीचा वसा दलित कवितेला घ्यावाच लागला. ही विद्रोही कविता आपली एक परंपरा सांगत होती. आणि एका अर्थाने जमीन भाजण्याचे कामही करीत होते. अस्पृश्यतेशी आणि दास्याशी, विषमतेशी आणि दु:खाशी विद्रोह करणे दलित कवितेला क्रमप्राप्तच होते. विद्रोही प्रकृतीच्या केशवसुतांचे ज्याप्रमाणे आपण कौतुक केले तसेच या विद्रोही दलित कवितेचे आपण कौतुक करावे [१६] कारण "विद्रोह" ही तर प्रकृती आहे.

दि.के.बेडेकर म्हणतात,[१७] संताप ही एक अमोल प्रतिकार शक्ती आहे. आणि या संतापाला जर कर्तृत्व, विशाल सामाजिक जाणिव, संयम आणि कल्पकता याची जोड असेल तर ही शक्ती क्रांती घडवून आणते.

आत्मनिवेदन आणि समाज परिवर्तन अशा दोन उद्दिष्टांनी व्यक्त झालेल्या दलित कवितेच्या विद्रोहामध्ये मराठी संस्कृती उन्नत करण्याची शक्ती आहे(नामदेव ढसाळांनी स्वत:च्या जळजळीत जीवनानुभवाचे स्वत:शीच केलेले चिंतन त्यांच्या कवितेचे अपरिहार्य रूप बनते) आजवर मराठी कवितेला अनोखे असलेले जीवनदर्शन गर्द हिरव्या घुमाऱ्या सारखे दलित कवितेतून रसरसत स साकार झाले असल्याचे अनेक विचारवंतानी मान्य केले आहे.

नामदेव ढसाळांची कविता स्वत:च्या जळजळीत जीवनानुभवाचे स्वत:शीच केलेले चिंतन आहे. त्यानी जे भोगले, त्यानी जे शेकणारं जीवन जगणे कठीण होत असताना देखील सहन केलेल त्या निराशेचे, दु:खाचे, त्यातील अनंत प्रकारच्या व्यथा वेदनांचे दुबळे चित्रण या साहित्यात येत नाही हे विशेष होय) स्वातंत्र्यप्राप्ती नंतर आलेल्या नैराश्याचे, उद्विग्नतेचे आणि विफलतेचे मराठी नवकवींनी केलेले चित्रण पाहिल्यावर तर दलित साहित्याच्या संदर्भात हे विशेष जाणवते. या विद्रोहाला सामाजिक परिवर्तनाची आस आहे. केवळ बंडा करता बंड ही भूमिका नाही. हे लक्षात घेतले म्हणजे विद्रोही

साहित्यामागची दुहेरी कार्यप्रणाली लक्षात येते.

[ज्या देशाने त्यांची कुठलीच इच्छापुरी केली नाही. उलट पशूहूनही नीच जिणे पिढ्यान्‌पिढ्या शतकानुशतके दिले त्यांनी " स्वातंत्र्य कंच्या गाढवीचं नावं ? " असा जळजळीत शब्दात प्रश्न विचारला तर चुकले काय ? जे जीवन आहे, जे काम आहे, ते लादलेले आहे, त्यात सक्ती आहे,त्याचा संबंध जातीशी,जन्माशी आहे असे म्हटले की ते नाकारण्याचा प्रश्न निर्माण होतो. हे फेकले पाहिजे, तोडले पाहिजे याच जाणिवेतून तीव्र नकार दलित साहित्यात उमटलेला आहे. असे दिसते. इतिहासाने अंधार दिला. भविष्याचा वाटा बंदिस्त केलेल्या होत्या,या कोंडीतून हा नकार - विद्रोह जन्माला आलेला आहे.]

दलित कवितेत असा संघर्ष,क्रांतिप्रवणता, आक्रमकता आहे. म्हणूनच ह्या कवितेला एक वेगळीच दाहकता लाभलेली आहे. व सामर्थ्यही आलेले आहे. ज्या साहित्याच्या मुळाशी संघर्ष किंवा परिवर्तनाच्या प्रेरणा असतात त्या साहित्याला एक वेगळेच सामर्थ्य लाभते. तसेच सामर्थ्य नामदेव ढसाळांच्या दलित कवितेला लाभले आहे.

* [ढसाळांच्या कविता म्हणजे केवळ बंडा करता बंड, किंवा विद्रोहासाठी विद्रोह या स्वरूपाच्या नाहीत. त्यांच्या बंडाला,विद्रोहाला सामाजिक परिवर्तनाची आस आहे.त्यांच्या साहित्यामागील ही दुहेरी कार्यप्रणाली स्तुत्य आहे.] या संदर्भात विद्रोही साहित्याच्या निर्मितीच्या प्रक्रियेचा प्रा.रा.ग. जाधव यांनी केलेला विचार महत्वपूर्ण वाटतो, त्यांनी असे सांगितले आहे की[18] "विद्रोही साहित्यातील शब्दांना एकाच वेळी संदर्भ असतात, आणि या दोन संदर्भाच्या ताणांमधून त्यांचा आशय रूपास आलेला असतो.आत्माविष्कार आणि समाज परिवर्तन अशा दोन उद्दिष्टांनी व्यक्त झालेल्या या नामदेव ढसाळांच्या दलित साहित्याच्या विद्रोहामध्ये मराठी संस्कृतीला उन्नत करण्याची शक्ती आहे. येणाऱ्याभावी जीवनाच्या वाटयातील होकाराचा

महान अर्थ या विद्रोहामध्ये आहे. मानव व त्याची श्रेष्ठमूल्ये या साहित्याने मानलेली असल्यामुळे माणसासाठी लढण्याचे - लढणाऱ्याचे ते साहित्य आहे. दलित साहित्याच्या निर्मितीमागील प्रयोजन असे त्याच्या आशयाच्या मुळाशी बांधले गेलेले आहे.

(ढसाळांच्या काव्यात दु:खग्रस्त, विषादपूर्ण, भ्रमनिरस्त, प्रक्षुब्ध, प्रलयकांक्षी आणि आशावादी मन दिसते. या सगळ्या मनोवस्था कोणत्या ना कोणत्या अनुभवाने केलेल्या जखमेने ढसाळांच्या कवितेत जाग्या होतात) त्या त्या अनुभवाशी त्या सेंद्रियपणे निगडीत असल्याने उपऱ्या नाहीत. केवळ बौध्दिक नाहीत." विचार " ही या मनोवस्थेचाच एक घटक वाटतो, हे या बाबतीत बाळकृष्ण कवठेकरांचे[१९] मत लक्षणिय वाटते.

[गावेशीच्या बाहेरील दलित जगतातील वेदना, आक्रोश, आणि त्याच वेदनातून, दु:खातून पेटलेले मन, प्रस्थापितांना, सवर्णांना कळालेच नाही. म्हणून ढसाळ म्हणतात ---

> हे वाद्या ! तू माणसालाच असे हीन केलेस
> तुला वेशीबाहेरला आक्रोश ऐकू आला नाही कां ?
> पेटलेला माणूस दिसला नाही कां ?
> उदासीनतेचा विराटपणा तुला स्पर्शला नाही कां ?
> विजेचा लोळ वेशीच्या तटबंदी फोडून आत येतोय रे
> सांग का देत नाहीस त्याला कडाडून मायेचे आलिंगन ?

प्रा. रा. ग. जाधव म्हणतात," दलित समाज युगानुयुगे पारतंत्र्यात खितपत पडला होता. म्हणून त्याला भाषेचे स्वातंत्र्यही लाभले नाही. एका तथाकथित प्रगट संस्कृतीच्या खटाऱ्यामागे मुक्या जनावरासारखा तो रखडत होता. त्याला माणसासारखी जीभ होती, श्वासनलिका होती. कंठ होता आणि त्याची ही भाषेची इंद्रिये निकामी करून ठेवली होती. प्रा. जाधव यांचे म्हणणे सत्य आहे ( समाज - प्रबोधन नोव्हेंबर - डिसेंबर १९७७ ) स्वातंत्र्य मिळाले आणि त्यांनाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले, नव्याने जागा झालेला शोषित दलित

समाज जे बोलेल तेच ढसाळ बोलू लागले. कारण त्यांचे हात जागे झालेत, त्याचे मन जागे झाले आहे. म्हणूनच ते म्हणतात ---

" मी तुला शिव्या देतो, तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो,
तुझ्या संस्कृतीला शिव्या देतो,
तुझ्या पाखंडीपणाला शिव्या देतो.
ईव्हन मी आईबापांना देखील शिव्या देतो . . . .
मी हे सारं काही बोलणार नव्हतो
पण माझे हात जागे झालेत "

म्हणूनच झोपडीझोपडीतून आता सूर्य पेटला आहे. पेटत्या मशाली घेवून गावेच्या गावे जाळून टाका अशी घोषणा करीत समतेचा ध्वज उंच धरून सत्वांचा उदयो स्तु करणाऱ्या या दलित साहित्याचे स्वागत करा. त्याला कडाडून मायेचे आलिंगन द्या असे ढसाळ सूचवितात.

सम्यक क्रांतीचे नेतृत्व करणारा नामदेव ढसाळ यांचा " गोलपिठा " दलितांच्या नवक्रांतीची मशाल घेऊनच आला आहे.

" तुझापोर हा पोर नाही
या युगातला तो क्रांतिपुत्र आहे त्याला चक्क दिसत आहे " असं नामदेव ढसाळ आईच्या समजुतीसाठी सांगत आहेत.

" दुनियेत चंद्रसूर्याच्या
मज कुणीच घेतले नाही
या जन्माची कधि माझ्या
कुणी आई झाले नाही . . .

* या भारतदेशात स्वातंत्र्यातही दलितांना स्वातंत्र्य नाही. म्हणून "रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो " या कवितेत नामदेव ढसाळ आपल्या हृदयातील शब्दांना बोलके करतात. आणि हातात बंडाची मशाल घेऊनच उठतात --

" रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो,
किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी ? "

असा प्रश्न नामदेव ढसाळ यांच्यापुढे उभा राहतो. आणि --

" माझ्याही आत्म्याने झिंदाबादची घोषणा केलीय
रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो,
आता शहराशहरात आग लावीत चला "

असे आवाहन ढसाळ करतात.

नामदेव ढसाळ म्हणतात ," धर्माच्या,जातीच्या ,दर्जाच्या नावाने उभ्या असलेल्या भिंतींच्या आसऱ्याला म्हणून फिरकू नका.त्या तुम्हाला चिरडतील.तडजोड टाकून सर्व थरातून वादळ उठवा व भिंतीचा अनादिबंध तोडा. जे जे हरकत घेतील त्यांना उकळत्या कढईत टाका. त्यांच्या गांवावरून गाढवांचा नांगर फिरवा,त्यांची मुंडकी वेशीवर टांगा " -- हे पाहिले आणि ऐकले की, दलित साहित्य सर्वकष क्रांतीचे नेतृत्व करण्याची इच्छा व्यक्त करीत आहे[२०] हे भालचंद्र फडके यांचे विधान अर्थपूर्ण वाटू लागते.

नामदेव ढसाळांच्या कवितेला हा विद्रोह पाहिला की यशवंत मनोहर म्हणतात[२१] त्याप्रमाणे विद्रोह इतका मूलभूत पातळीवरून आणि निरीश्वरवाद उरात घेऊन यापूर्वी कधीच अवतरला नव्हता.शोषक मूल्याविरूध्द असे रान यापूर्वी कुणीच उठविले नव्हते.दलित कविता म्हणजे तिसरी आघाडी हे मत पटू लागते.

नामदेव ढसाळांच्या संदर्भात या ठिकाणी विद्रोही कविता आणि दलित कविता अशा दोन संज्ञा या चर्चेत आपण वापरल्या, या ठिकाणी स्पष्ट करावयाचे आहे ते असे की, सर्वच दलित कविता विद्रोही नाही. आतडी पिळवटून टाकणारे उद्गार " या कवितेत पहावयास मिळतात. ढसाळांच्या कवितेत असे व्याकुळ करणारे उद्गार अनेक ठिकाणी आहेत.

" वाढ गे बाये पाणी वाढ गे
बायशी धार सोड माये
सोकन पडलीय घशाला
आवं दादा आवं पाटील
आवं धनी आवं घेवा "

असे आर्त करणारे उद्गार वाचले की,त्यांचीसंपूर्ण कविताच दलितांच्या जाणिवेला, दु:खाला एक नवा आकार देत असल्याचे जाणवते.

"गोलपिठा " या काव्यसंग्रहात " तिला आणि तिच्या फुलझाडांना", "अलिकडे तिच्या वाटेत " इ. दलित नसणाऱ्या विषयावरील काही कविता आहेत.पण ढसाळांच्या कवितेचे सामर्थ्य तिच्या मधून व्यक्त होणाऱ्या दलित आशयात आहे. ती दलित जाणिवेला आकार देते यात आहे. दलित नसणाऱ्या विषयात ढसाळांचे व्यक्तिमत्व रमू शकत नाही. आणि त्यामुळे अशा कविता कवितापण हरवून बसताना दिसतात.

नामदेव ढसाळांनी दलित संग्रहाना,त्यातील कवितांना दिलेली शीर्षके सुध्दा या दृष्टीने लक्षात घेण्यासारखी आहेत. "त्याची सनातन दया", "माणसं मादरन " -- "अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा ","बेबींचा देठ ओला होणाऱ्या वयात ","रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो"," येथला प्रत्येक हंगाम", "जंताच्या माळा गळ्यात घालून", "कॉम्रेड अर्थात १२ बलुतेदारांसाठी " इ. सर्व शीर्षकामधून ती आपल्या प्रकृतीधर्माची वैशिष्टये विशद करीत आहे. क्रांतिकारकता,लढव्ययावृत्ती,परंपरेचा विद्रोह, निषेध आणि नवयुगाचा जाहीर-नामा तिनेवेळोवेळी प्रकट केलेला आहे. आणि "जगबदल घालुनी घाव", सांगून गेले भीमराव " -- असे म्हणत चिडलेल्या , दडपलेल्या,नाकारलेल्या समाजाचे दु:ख सांगत,संताप व्यक्त करीत, शिव्याशाप देत,आग ओकत दलित कविता जन्माला आली आहे.

ढसाळांची कविता ही विलक्षण त्वेषाने व आवेशाने बोलत आहे. ढसाळांच्या कवितेतील शब्द व त्यांचीरचना,संताप ही वाचकाना चक्रावून सोडण्यासाठी,त्यांना हादरे देण्यासाठी आहे असे कांही समीक्षकांना वाटते. सौ.विजया राजाध्यक्ष म्हणतात," ढसाळांच्या कवितेत येणारा संताप,व्देष, अभिनिवेश व त्यातून व्यक्त होणारी थोडीफार अतिशयोक्ती ही त्या जीवनाचा भाग आहे असे नसून वाचकाला चक्रावून सोडणे वा हादरवून सोडणे हे परिणाम त्यांच्या कवितेने होतात "[२२] पण संस्कृतीत मुरलेल्या अनिष्ट रोगाचे समूळ उच्चाटन केल्याशिवाय संस्कृतीला चैतन्य लाभणार नाही.दलित कवींना संस्कृतीला अवकळा आणणाऱ्या अस्पृश्यतावादी कल्पनाच उध्वस्त करावयाच्या आहेत. सगळे काही झुगारुन देण्याची दलितांची भाषा पोकळ नाही.स्वातंत्र्य,समता, बंधुत्व,न्याय ही चार तत्वे दलित कवींनी श्रेष्ठ मानली आहेत. शतकानुशतके सोसाव्या लागणाऱ्या छळामुळे,अन्यायामुळे,समाजाच्या मनात जे प्रक्षोभक भाव उदयाला आले त्या समाजाचे मन ढसाळांनी अतितीव्र प्रखर शब्दांत व्यक्त केले आहे. तेव्हा प्रा.विजया राजाध्यक्षांच्या मतात तथ्य नाही हे लक्षात येते आणि या संदर्भात विजय तेंडुलकर यांचे [२३] " ही बंडखोरी आत्म्याची आहे,कंठाळी नाही.या बंडखोरीला - कवितेपुरते तरी - राजकीय रंग नाहीत. ती अधिक मूलभूत स्वरूपाची म्हणून अस्सल आहे " हे म्हणणे ग्राह्य धरावे लागते.

ढसाळांच्या कवितेतील शब्दामुळे सामान्य वाचकाला हादरे बसत असतीलही,पण ही कविता अवतरते ती हादरे देण्यासाठी नाही.उलट शतकानुशतके असे गोळा पिळयावरचे हे जीवन जगताना कोणत्या गुळगुळीत शब्दांची अभिव्यक्ती कवितेतून व्हावी ? येथे माणसाला माणूस म्हणून किंमत नाही. स्वातंत्र्य प्राप्त होऊन अनेक वर्षे लोटली तरी सुध्दा वर्णव्यवस्थेच्या व समाजव्यवस्थेच्या रचनेमुळे ज्याला देशाने, स्वातंत्र्याने काहीच दिले नाही,उलट सतत नैराश्य,लाचारी,दैन्य,अन्याय हेच दिले,त्याच्यातील

प्रक्षुब्ध झालेला हा कवी असेच बोलणार मग ते सौ. विजया राज्याध्यक्ष सारख्या समीक्षकांना रूचो अथवा न रूचो ! असेच शब्द त्याच्या ओठी येणार. त्याच्या जीवनाचा अपरिहार्यभाग म्हणूनच ही अशीच निर्मिती होणार.

१९१८ सालच्या भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चढ्या व आक्रमक भूमिकेचे स्पष्टीकरण केलेले आहे ते म्हणतात --

" उद्दामपणाची आम्हाला सवय आहे अगर चढेलपणाचे चाळे करण्याची हौस आहे असे थोडेच आहे ? दिवसभर काबाडकष्ट करून पोटासाठी दोन घास कसे मिळवता येतील ही विवंचना आमची रोजची सोबतीण. पण भाकरीपेक्षा माणुसकी श्रेष्ठ म्हणून आम्ही या यातायातीत पडलो कारण ठोठावल्या शिवाय दरवाजे उघडत नाहीत आणि हिसकावून घेतल्याशिवाय माणुसकीचे साधे हक्कही मिळत नाहीत " -- याचा तात्पर्यार्थ असा की नामदेव ढसाळादी दलित कविंचा हा विद्रोह चकावून सोडण्यासाठी नसून तो त्यांच्या जीवनाचा भाग आहे, स्वत:च्या शोधाकरता केलेला तो विद्रोह आहे.प्रा.सौ. विजया राजाध्यक्ष यांना वाटते तशी ढसाळांची कविता फार एकेरी,आततायी, विषम व कळलेली नाही, तर ती आपल्या मनाच्या जखमा नि:संकोचपणे उघड्या करून दाखविणारी आणि आजवर जे भोगले ते सांगता सांगता प्रस्थापित उलथून टाकण्याच्या पवित्र्यात उभी असणारी आहे. आपल्या भोवतीच्या वास्तवाची भयानकता ते व्यक्त करतात.नुसते "गोळापिठया" तील जीवनाचे दाहक भान आणून देणे हे तिचे उद्दिष्ट नाही.तर " माणूस " म्हणून जगण्याचा हक्क मिळवू पाहणाऱ्या समाजाच्या मनातला धुमसत राहिलेला अंगार तिला व्यक्त करावयाचा आहे. दलित लेखकांच्या लेखनातून दलितांवर होणाऱ्या अत्याचारांविषयी संताप व्यक्त होईल.आपल्या हीन लेखणाऱ्या समाजाविषयी चीड व्यक्त होईल.पण दलित साहित्य हे सूडवाद्यांचे साहित्य असणार नाही. ते माणूस म्हणून जगू इच्छिणाऱ्याचे साहित्य असेल.

नामदेव ढसाळादी दलित साहित्यिकांच्या साहित्यामध्ये "फॅशनेबल प्रक्षोभ" आहे किंवा "फक्सुरी कंटाळवाणेपणा" आहे असा आक्षेप जेव्हा घेतला जातो त्या वेळेला या विद्रोहाची आकृती आणि प्रकृती कशी आहे ते शोधावे लागते. दलित साहित्याची ही बंडखोरी, हा प्रक्षोभ, हा विद्रोह डॉ. भीमराव कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे कम्युनिस्टासारखा खोटा व ठरबडवा नाही. आणि प्रा. विद्याधर पुंडलिक म्हणतात त्याप्रमाणे चिडीवर, संतापावर आधारलेले हे साहित्य अल्पजीवी ठरणार नाही. कारण कोणतीही जाणीव मग चिडीची असो, संतापाची असो ती खरीखुरी असेल तर ती झपाटून टाकते. अल्पजीवी ठरते ते चिडीचे वा संतापाचे प्रदर्शन ! दलित लेखकांनी जे भोगले आहे त्याचे त्यांना दर्शन घडवावयाचे आहे. तसेच संतापातून, चिडीतून उद्भवलेले साहित्य केव्हा अल्पजीवी ठरते ? जेव्हा त्याच्या मागे मूल्यभाव नसतो. पण दलित साहित्याचा माणूस हाच केन्द्रबिंदू आहे. म्हणून नामदेव ढसाळादी दलित साहित्यिकांना वाटते की, माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. त्याच्यातल्या महानतेच्या विकासाला सर्व दिशा मोकळ्या झाल्या पाहिजेत. त्यासाठी दलित लेखकाला विद्रोहाच्या वाटेने जावे लागले आहे. नामदेव ढसाळांनी नकाराबरोबर स्वीकारले आहे ते माणसाचे गाणे, माणुसकीला महान मानणारे जग. "माणसाने" या कवितेत ते "स्वप्न" व्यक्त करताना ते म्हणतात ---

" नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये लुटू नये
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानून त्याच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे
चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा माणसावरच सूक्त रचावे
माणसाचेच गाणे गावे माणसाने "

असा मूल्यभाव असणारे ढसाळांचे साहित्य प्रा. विद्याधर पुंडलिक म्हणतात म्हणून

अल्पजीवी ठरणार आहे काय ?

मराठी साहित्यात केशवसुत,कुसुमाग्रज, विंदा करंदीकर,शरच्चंद्र मुक्तिबोध,वसंत बापट आणि मंगेश पाडगांवकर आदी कवींचीही मानवतावादी कविता प्रसिध्द आहे. या सुप्रसिध्दकवींनी विषमता,पिळवणूक व अन्याया - विरूध्द चीड निर्माण करणाऱ्या कवितेला जन्म दिला आहे.या अशा आशयांची त्यांची कविता स्वयंप्रकाशित असून अन्यायाविरूध्द आवाज उठवते. मराठीतील या कवींची अशा आशयाची कविता नामदेव ढसाळांच्या दलित कवितेला जवळची कविता आहे. या कविता सुधारणावादी, मुर्तिभंजक आहेत. नवनिर्मितीकार मानवतावादी आहेत. हे कवी क्रांतीचा आवाज उठविणारे आहेत. "स्वातंत्र्य कुठे ? कुणा स्वातंत्र्य ? " असा उघड सवाल करणारे आहेत, " हे बुध्दराज ! देहात आमुच्या तुम्हीच चेतना . . . प्राण " असा कबुली बोल करणारे आहेत. मराठी साहित्यातील या कवींची या आशयाची कविता ढसाळादी दलित कवीच्या कवितेजवळची आहे.

अशाही परिस्थितीत ढसाळांची दलित कविता ही पांढरपेशी मराठी कवितेपेक्षा तिची भाषा,आशय, अभिव्यक्तीने मूलगामी वेगळ्या स्वरूपाची आहे. ती दलितत्वाच्या सामाजिक जाणिवेने,सामाजिक आशयांनी परिपूर्ण आहे. ती कविता कवीची व्यक्तिकेंद्री नसून समष्टीची सर्व समूहाची आहे. ती युगानुयुगे दडपलेल्या, पिळलेल्या समाजाचे दास्य,दु:ख गाते. आणि दास्यातून, दु:खातून मुक्तीचा मार्ग शोधते.बंधुता,समता न्याय व स्वातंत्र्य " यावर आधारलेला नवसमाज निर्माण करण्यासाठी ती धडपडते. ढसाळांच्या दलित साहित्याला प्रेरणांचा भरभक्कमपणा आणि समृध्द अनुभवांचा सच्चेपणा यांचा आधार आहे.त्यांच्या आविष्कारात मोकळेपणा,परखडपणा व निर्भयता आहे. अशा आत्मतेजी दलित वाङ्मयाचा वेगळेपणा निश्चितच जाणवतो.

## संदर्भ ,टीपा इ.


| | | |
|---|---|---|
| १ ढसाळ नामदेव | - | -हाडकी हाडवळा,अस्मिता प्रकाशन,पुणे १९८१,लेखकाचे निवेदन,पृ.१२४. |
| २ तेंडुलकर विजय | - | गोलपिठा, नीलकंठ प्रकाशन,पुणे-३० १९७५,प्रस्तावनेतून. |
| ३ पानतावणे गंगाधर | - | विद्रोहाचे पाणी पेटले आहे,विजय प्रकाशन,नागपूर,१९७६,प्रस्तावनेतून. |
| ४ खरात शंकरराव | - | दलित वाङ्मय:प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधु प्रकाशन,पुणे,मार्च १९७८, पृ.२५ |
| ५ ठकार निशिकांत | - | मराठी कविता: स्वरूप आणि विवेचन. |
| ६ तेंडुलकर विजय | - | गोलपिठा,नीलकंठ प्रकाशन,पुणे-३० १९७५,प्रस्तावनेतून |
| ७ मनोहर यशवंत | - | स्वाद आणि चिकित्सा,धनंजय प्रकाशन, नागपूर,जाने.१९७८,पृ.९८. |
| ८ ढसाळ नामदेव | - | आम्ही,दिवाळी अंक,१९७३,पृ.७८ |
| ९ राजाध्यक्ष विजया | - | गोलपिठा : एक काव्यानुभव,सत्यकथा जुलै ७३ |
| १० सरदार गं.बा. | - | दलित साहित्य संमेलन,१९७८,अध्यक्षीय भाषणातून. |
| ११ फडके भालचंद्र | - | अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन, वणी,येथील अध्यक्षीय भाषणातून |

१२ सरदार गंगा. - दलित साहित्य संमेलन,१९७८, अध्यक्षीय,भाषणातून.

१३ इनामदार हेमंत - दलित कविता: एक दर्शन,प्रतिमा प्रकाशन पुणे,फेब्रु.८४, पुरस्कारातून.

१४ फडकुले निर्मलकुमार - साहित्यवेध,व्हीनस प्रकाशन,पुणे, एप्रिल १९७८,पृ.१०२.

१५ खरात शंकरराव - दलित वाङ्मय: प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधु प्रकाशन,पुणे,मार्च १९७८, पृ.६८.

१६ फडके भालचंद्र - दलित साहित्य : वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन,पुणे,डिसेंबर १९७८, पृष्ठ १९९.

१७ बेडेकर दि.के. - समाज चिंतन,मधून उद्धृत.

१८ जाधव रा.ग. - निळीपहाट,श्रीविद्या प्रकाशन,पुणे, द्वि.आ.जून १९७९,पृ.२४.

१९ कवठेकर बाळकृष्ण - दलित साहित्य: एक आकलन,अजब पुस्तकालय,प्रकाशन,कोल्हापूर,जानेवारी १९८१,पृष्ठ २७.

२० फडके भालचंद्र - दलित साहित्याची प्रकाशयात्रा, आनंदप्रकाशन,औरंगाबाद,डिसेंबर १९८०, पृ.७२.

२१ मनोहर यशवंत - स्वाद आणि चिकित्सा,धनंजय प्रकाशन, नागपूर,जाने.७८,पृ.९८.

२२ राजाध्यक्ष विजया - गोलपिठा : एक काव्यानुभव
सत्यकथा, जुलै १९७३.

२३ तेंडुलकर विजय - गोलपिठा, नीलकंठ प्रकाशन,पुणे ३०,
१९७५, प्रस्तावनेतून.